महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचे कार्यालय,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, लातूर.
(Phone No. 02382-255135; Email Id : djr_ltr@rediffmail.com)

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ अन्वये आदेश

**वाचा :**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३-अअअ (३)(१) व ७७-अ मधील तरतूद.
२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दि. २४ नोव्हेंबर, २०२१.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र १५ एप्रिल, २०२६ असाधारण क्र. २२.
४. या कार्यालयाचे आदेश जा. क्र. प्रशासन/नांदेड जिमस बँक लि/कलम ७७-अ/ ७७१ /२६. दिनांक :- २७ एप्रिल, २०२६.
५. मा. अपर निबंधक, तथा सह सचिव, महाराष्ट्र शासन, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक : जिमस ०३२६/प्र. क्र. ४५/२-स, दि. १९ मे, २०२६

ज्या अर्थि,

वाचा क्र. ३ चे महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम (सुधारीत) २०२६ प्रकाशीत करण्यात आले असून त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ७३-अअअ चे पोटकलम (३) अंतर्गत परंतुक (१) रद्द करण्यात आले असून परंतुक (२) मधील संस्थांमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ मधील नियम ४ मध्ये नमूद असलेल्या 'अ' वर्ग संस्था वगळण्यात आल्या आहेत.

शासनाने वेळोवेळी दिलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुकीवरील स्थगितीमुळे दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड बँकेची निवडणूक प्रक्रिया दि. ०३ एप्रिल, २०२६ पुर्वी पूर्ण होऊ शकलेली नाही; परंतु दि. १५ एप्रिल, २०२६ पुर्वीच्या अस्तित्वात असलेल्या कलम ७३-अअअ (३) मधील तरतुदींनुसार उक्त बँकेची निवडणूक ही शासनाने काढलेल्या आदेशामुळे होऊ शकलेली नसल्यामुळे व वर नमूद केल्याप्रमाणे कलम ७३-अअअ (३) मध्ये दि. १५ एप्रिल, २०२६ च्या शासन राजपत्रानुसार बदल झाल्याने नवीन तरतुदीनुसार उक्त बँकेच्या संचालक मंडळाचा कालावधी संपुष्टात आला असल्याने व त्यांची पदे रिक्त झालेली असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ (१) (दोन) मधील तरतुदीनुसार या कार्यालयाचे वाचा क्र. ४ (दि. २७ एप्रिल, २०२६) अन्वये दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड या बँकेचे विद्यमान संचालक मंडळ निष्प्रभावीत करून बँकेचे दैनंदिन कामकाज पाहाण्यासाठी श्री. शाहुराज हिरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांची 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली.

तथापि, मा. अपर निबंधक तथा सहसचिव, महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र वाचा क्र. ५ (दि. १९ मे, २०२६) अन्वये दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड या बँकेवर जिल्हाधिकारी, नांदेड यांची 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करणेबाबत निर्देशित केले आहे.



Scanned with OKEN Scanner

उक्त निर्देश विचारात घेता दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ मधील तरतुदीनुसार या कार्यालयाचे वाचा क्र. ४ दि. २७ एप्रिल, २०२६ चे आदेशामध्ये अंशत: बदल करणे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

-: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ (४) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी, प्रवीण फडणीस, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर या आदेशान्वये दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड या बँकेचे बँकेचे दैनंदिन कामकाज पाहाण्यासाठी श्री. शाहुराज हिरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांचेऐवजी श्री. राहूल कर्डिले (भाप्रसे), जिल्हाधिकारी, नांदेड यांची 'प्राधिकृत अधिकारी' म्हणून नियुक्ती करीत आहे.

सदर आदेश आज दि. २० मे, २०२६ रोजी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेसह पारीत केला आहे.

(प्रवीण फडणीस)
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

जा. क्र. प्रशासन/नांदेड जिमस बँक लि/कलम ७७-अ/ १३५/२६.
दिनांक :- २० मे, २०२६.

प्रतिलिपी :-
१) संबंधितास नावाने.
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड
३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, नांदेड
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
१) मा. अपर मुख्य सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई.

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

Scanned with OKEN Scanner